# संत कबीरांच्या वाणीतील अध्यात्मिकता

प्रा. डॉ. सुजय बाबुराव पाटील, मराठी विभाग प्रमुख,कमला कॉलेज, कोल्हापूर. मो. ८४२१६६८४०६,ई मेल: sujaybpatil@rediffmail.com

**प्रस्तावना**

मध्ययुगात भारतीय संत परंपरेत संत कबीरांचे स्थान अनन्य साधारण असे आहे. सुमारे पंधराव्या शतकापासून भारतीय समाज जीवनावर आपल्या दोह्यांच्या द्वारे प्रभाव टाकणारा हा संत आध्यात्मिक, भौतिक, सामाजिक जीवनात अनेकांना दिशा देण्याचे काम करताना दिसतो. त्यामुळेच रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर अनेकांना कबीर आपले वैचारिक गुरु वाटतात.

रवींद्रनाथ टागोरांनी कबीरांच्या दोह्यांचे इंग्रजीत अनुवाद करुन ते जगभर पोहचविले. मा. गांधीच्या विचारांच्या मुळांशी कबीरांच्या संस्कारांची शिकवणी दिसते. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आपले गुरु मानले होते. ज्या पध्दतीने महाराष्ट्रातून प्रत्येक घरात ज्ञानोबा ते तुकोबा या संतांचे अभंग मोठया श्रध्देने रोज म्हटले जातात त्याप्रमाणे उत्तर भारतात घराघरात कबीरांचे दोहे मोठया भक्तीभावाने म्हटले जातात. अशा या महान संताच्या वाणीमधील अध्यात्मिकतेचा विचार पाहण्याआधी तत्पूर्वी त्यांच्या चरित्राचा थोडक्यात परामर्श होणे. संयुक्तिक ठरेल.

**संत कबीराचा जन्म**

संत कबीरांचा जन्म हा अनेक दंतकथा, लोककथा यांनी व्यापलेला आहे. त्यांच्या जन्माविषयी व जन्म तारखे विषयी अनेक मतमतांतरे आहेत.

काही लोकांच्यामध्ये असे मानतात की कबीर विधवा बाईच्या पोटी जन्माला आले. तिने जननिंदेखातर त्या बालकास तळयाकाठी ठेऊन दिले. तळयाकाठी सोडून दिलेले हे बालक निरु व निमा या मुस्लिम विणकर पतीपत्नीस सापडले. व पुढे त्यांनी त्याला वाढविले. सांभाळ केला.

कबीरांच्या जन्माप्रमाणे त्याच्या जन्मतारखेविषयी ही मतमतांतरे आहेत. कबीरांच्या जन्मतारखा तीन प्रकारच्या सांगितल्या जातात. रवींद्रनाथ टागोर इ.स.१४४० मध्ये कबीराचा जन्म झाला असे मानतात. कबीरांचे भक्तगण त्यांचा जन्म सन १३९८ मध्ये काशी क्षेत्री झाला असे मानतात. त्यासाठी पुरावा म्हणून कबीराचा पुढील दोहा ग्राह्य मानतात—

चौदह सौ पचपन साल गए।
चंद्रवार इक ठाठ ठए।
जेठ खुदी बरसायत को।
पुरन मासी प्रगट भए।

विक्रम संवत १४५५ (इ.स.१३९८) सोमवार वट सावित्रिच्या ज्येष्ठ शुध्द पौर्णिमा या दिवशी कबीरांचा जन्म झाला असे कबीरपंथी या दोह्याच्या आधारे मानतात व याच दिवशी ज्येष्ठ पौर्णिमेस कबीर जयंती साजरी करतात.

**कबीरांचे शिक्षण**

कबीरांच्या कालखंडात समाज जीवनात प्रत्येक पातळीवर भेदभाव मानला जात असे. गोरगरीब तसेच खालच्या वर्गातील लोकांना त्यांच्या मुलालेकरांना शिक्षणाची दारे उघडली जात नसत. कबीर तर 'निरु निमा' सारख्या सामान्य विणकरांच्या घरात वाढत होते. साहजीकच त्यांनाही पारंपारिक शिक्षणापासून दूर रहावे लागणे स्वाभाविक होते.

समाज जीवनाचे सखोल निरीक्षण, अनुभव व बहुश्रुतता या जोरावर लौकीकार्थाने निरक्षर असणाऱ्या कबीरांनी समाजाला अध्यात्माचा, बंधुतेचा, माणुसकीचा मार्ग दाखविला. आपल्या शिक्षणाविषयी सांगताना कबीर म्हणतात 'मी शाई वा कागदाला स्पर्श ही केला नाही कधी लेखणीही हातात धरली नाही. पण चारही युगातील ज्ञान मी केवळ ऐकून प्राप्त केले. आपल्या दोह्यामध्ये कबीर म्हणतात.

मसि कागद छुयो नही, कलम गहि नही हाथ।
चार ही युग की महातम, मुखहि जनाई बात।

कबीरांना लिहिता वाचता येते नव्हते. अनुभवातून सत्संगातून त्यांनी ज्ञान प्राप्त केलेले होते. आपले विचार ते दोहे, साखी या माध्यमातून बोलून दाखवत व त्यांचे शिष्य ते लिहून ठेवत. हे विचार बानी, वचन, आदेश या नावाने ओळखले जातात. कबीरांचे शिष्य भगवानदास यांनी कबीरांच्या ६०० पदांचा संग्रह तयार करुन ठेवलेला आहे. तो 'बीजक' या नावाने ओळखला जातो. कबीरपंथीय लोक 'बीजक' हा आपला धर्म ग्रंथ मानतात. कबीर ग्रंथावली हा देखील एक महत्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात कबीराचे ४०० दोहे व ८०० साख्या व इतर पदांचा समावेश आहे.

कबीरांची भाषा पुरवी हिंदी आहे. या भाषेत अवधी, व्रज, भोजपुरी, खडीवाले, अरबी, फारशी अशा तत्कालीन सर्व भाषेतील शब्द मोठया प्रमाणात आढळतात. त्यांच्या भाषेला 'सुधुक्कडी' असेही म्हटले जाते. कबीरांच्या अनेक रचनांचा समावेश 'श्री गुरु ग्रंथ सहिबा' मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**स्वामी रामानंद आणि कबीर**

तत्कालामध्ये स्वामी रामानंद हे काशी क्षेत्रातील महान सत्पुरुष होते. त्यांच्याकडे अनेक जाती धर्मातील लोक जात येत असत. ते सर्वांना वेद, उपनिषिदे, शास्त्रे पुराणे यांच्या आधारे मार्गदर्शन करीन. त्यांनी ही अनेक रचनांची निर्मिती करुन ठेवलेली आहे. त्यांच्या अनेक रचनांचा समावेश 'गुरुग्रंथ साहेबा' या ग्रंथात केला गेलेला आहे. कबीरांचे देखील स्वामी रामानंदाकडे जाणे येणे घडत असे. स्वामी रामानंदाच्याकडूनच गंगाधाटावर कबीरांना रामनामाची दीक्षा मिळाली असे मानले जाते. आपल्या साख्यात गुरु महिमा गातांना कबीर म्हणतात.

'तीन लोक नौखंडमे गुरुते बडा न कोइ।

करता करै न करि सकै गुरुते बडा न कोइ।'

**संत कबीरांचा संघर्ष**

संत कबीरांच्या चरित्रात प्रारंभीच्या कालखंडात त्यांना मुल्ला, मौलवी व पुरोहित यांच्याबरोबर संघर्ष करावा लागलेला होता असे दिसते. हा संघर्ष मात्र वैचारिक असा होता. या संघर्षाच्या निमित्ताने कबीरांचे चरित्र मात्र अद्भुत रम्यतेने व्यापलेले दिसते.

कबीर मुसलमान समाजातील असून ही रामाचे नाव घेतात. हिंदूच्या देव—देवतांची पूजा अर्चा करतात. मुसलमान समाजातील अनिष्ठ रुढी, पूजा परंपरा, अत्याचार या गोष्टींच्यावर कडाडून हल्ला चढवितात म्हणून मुसलमान समाजातील मुल्ला, मौलवी, अमीर उमराव यांनी त्यांना विरोध केला. तसेच कबीर हिंदू समाजातील पुरोहित, कर्मकांड ह्यावर देखील हल्ला चढवतात म्हणून हिंदू समाजातील पुरोहित वर्ग, उच्चवर्णीय लोक यांनीही कबीरांना विरोध केला होता. पण या सर्व विरोधाला न जुमानता कबीरांनी आपल्या दोह्यांतून सर्व सामान्य समाजाला खरा भक्तीमार्ग सांगितला समाजाचे प्रबोधन केले.

कबीरांच्या विरोधकांनी बादशहा सिकंदर लोदी याच्याकडे खोटया तक्रारी करुन बादशहाचे कबीरा विषयीचे मत कलुषित केले. बादशहाने कबीरांना गंगा नदीत बुडविण्याची, हत्तीच्या पायाखाली तुडवुन मारण्याची शिक्षा दिली पण या सर्वांतून कबीर सुखरुप बाहेर पडले. बादशहाचे कबीरांचे सामर्थ्य ओळखले. बादशहा कबीरांना शरण गेला. सर्वत्र कबीरांचा लौकीक वाढला कबीर एका दोह्यात लिहतात—

'कबीर ना हमा किआ न करहिगे, ना करि सके सरीरु।

किआ आनऊ किछु हरि कीआ, भइओ कबीरु कबीरु।।'

**अर्थः** 'मी काहीही केले नाही. काही करु ही शकणार नाही. जे काही केले. जे काही घडले. ते त्या प्रभु परमात्म्यानेच केले. पण लोकात मात्र कबीराचे नाव झाले.

**कबीर कमाल आणि कमाली**

कबीरांचा मुलगा कमाल आणि मुलगी कमाली यांच्याविषयी एक प्रचलित कथा आहे, कबीर तर ब्रह्मचारी होते मग कमाल आणि कमाली ही मुले त्यांना कशी याविषयी कथा प्रचलित आहे. ही कथा मोठी विलक्षण अशी आहे. शेख तकी, हे कबीराच्या बरोबरीचे एक सुफी होते. कबीराची लोकप्रियता त्यांना सहन होत नव्हती. शेख तकी हे कबीरांच्या नेहमी द्वेष करीत. बादशहा सिकंदर लोदीकडे ते नेहमी कबीराविषयी खोटया तक्रारी करीत. एकदा बादशहा, शेख तकी व कबीर गंगा किनारी बसले असता. गंगेच्या पात्रातून एका मुलाचे प्रेत वहात येतांना सर्वांना दिसले. कबीरांच्या अपमान करण्याच्या उद्देशाने शेख तकी यांनी उदगार काढले की, कबीर स्वतःस ईश्वराचा अवतार समजोतस ना? मग या प्रेतास सहज जिवंत करा कबीरांनी हात उंच करुन त्या प्रेतास आपल्याकडे येण्यास सांगितले ते प्रेत वाहत कबीरांकडे आले. "ह्या मृत शरीरातील आत्मा परत ह्या शरीरात प्रवेश करो" अशी कबीरांनी प्रार्थना करताच ते प्रेत जीवंत झाले व पाण्याबाहेर येऊन त्या मुलाने कबीरांच्या चरणावर आपले मस्तक ठेवले. बादशहा सिकदंर लोदी आश्चर्याने ओरडला. 'वाह खुब कमाल! तेव्हा पासून त्या मुलास 'कमाल' हे नाव मिळाले. व तो कबीराचा मुलगा म्हणून ओळखला जाऊ लागला.

कमाली बद्दल तशीच एक कथा प्रचलित आहे. कमाली ही शेख तकींची मुलगी होती. ती वारल्यावर तिला कबीरीमध्ये पुरण्यात आले शेख तकी कबीराची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने म्हणाले. जर 'कबीराने ह्या मुलीस जिवंत केले तर मी जन्मभर त्यांचा गुलाम होईन. त्यांच्या शिष्य बनून राहीन. शेख तकी व कबीर कमालीच्या कबरीपाशी गेले. शवपेटीजवळ माती दूर करण्यात आली. कबीर म्हणाले "शेख तकी च्या मुली ऊठ!" पण काही घडले नाही असे तीन वेळा झाले. शेवटी कबीरांनी कळकळीने प्रार्थना केली. हे कबीरांच्या मुली ऊठ!' प्रभु कृपेने ते प्रेत जीवंत झाले. शेख तकींची मुलगी कबरीतून बाहेर आली तिने कबीरांना नमस्कार केला। शेख तकीकडे न जाता ती कबीरांच्या घरी आली. हीच कबीराची मुलगी म्हणून ओळखली जाऊ लागली. तिचे नाव कमाली असे ठेवण्यात आले. कबीरांच्या मुलांविषयीच्या ह्या प्रचलित कथा अद्भुत अशा आहेत.

**संत कबीरांचे निर्वाण**

१५१८ मध्ये कबीरांचे निर्वाण झाले. कबीरांनी आपल्या जीवंतपणी समाज प्रबोधन तर केलेच पण निर्वाणानंतर ही समाजातील गैर समजूतींना, धक्का दिला. त्यावेळी अशी समजूत होती की व्यक्तीला काशीक्षेत्री मरण आले की त्याला स्वर्गप्राप्ती होते व मगहर या गावी मृत्यु आला की तो अशुभ असतो. ती व्यक्ती पुढील जन्मी गाढवाच्या कुळात जन्मते. कबीर नेहमीच सांगत की, मनुष्य कोठे जन्माला आला व कोठे मरण पावला याला महत्व नसून तो कसा जगला याला महत्व आहे. स्वतःचे कर्तृत्व त्याने किती संपन्न बनवले याला महत्व आहे. कबीरांचे सांगणे व वागणे यात एकवाक्यता होती. कबीर कर्तृत्व संपन्न जगले व निर्वाणीच्या वेळी वाईट

विचारांवर हल्ला चढविण्यासाठी त्यांनी जाणिवपूर्वक 'मगहर' या क्षेत्री आपला देह त्याग केला. मगहर या गावीच ते अनंतात विलीन झाले.

**कबीरांनी सांगितलेले 'नामस्मरणाचे महत्व'**

भारतीय संत साहित्य परंपरेने 'नामस्मरण' भक्तीला विशेष महत्व दिले गेले आहे. सर्व संतानी 'नामस्मरण' भक्तीचा पुरस्कार केलेला दिसतो. सात्विक अंत:करणाने घेतलेले प्रभूचे नाम भक्ताला तारक ठरते असे संतांचे सांगणे आहे. कबीर देखील त्याला अपवाद नाहीत. कबीरांनी नामस्मरण भक्तीचा पुरस्कार करतांना आपल्या भोवतालच्या विविध गोष्टींचे दाखले दिलेले आहेत अशा वेळी ते पक्षी, झाड, बकरी, वाद्य व त्यातून निघणारे सूर, तलाव, राजहंस इ. प्रतिमांचा वापर करतात व नामस्मरणाचे महत्व पटवून देतात. या सर्व प्रतिमा सामान्य लोकांच्या नित्यांच्या परिचयाच्या असल्यामुळे कबीरांच्या उपदेशवाणीतील मर्म लगेच समजून येते. हा सोपेपणा कबीरांच्या भाषाशैलीचे वैशिष्टये आहे.

प्रभुनाम रुपी जल, मानवी मनाला लागलेली विषयवासनांची आग शांत करु शकते. नामस्मरणाने संसाररुपी भवसिंधू आपण तरुन जाऊ शकतो. असा विचार मांडताना कबीर लिहतात—

'अब मोहि जलत, राम जलु पाइआ।
राम उदकि, तनु जलत बुझाइआ।। रहाउ।।
मनु मारण कारणि, बन जाईए
सो जलु, बिनु भगवंत न पाईऐ।। १।।
जिह पावक सुरि नर है जारे।
राम उदकि, जत जलत उबारे ।। २।।
भवसागर सुख सागर माही।
पावि रहे जल, निखुटत नाही ।। ३।।
कहि कबीर, भजु सारिंगपानी।
राम उदकि, मेरी तिखा बुझ नी।। ४।।

कबीर सांगतात की, मी मोह मायेच्या विषय विकाराच्या अग्नीत जळत होतो. पण आता मला प्रभुनाम रुपी जल प्राप्त झालेले आहे. त्या नाम जलाने माझ्या अंत'करणातील मोहमायेची, विषय विकारांची आग विझवली आहे. माझे मन आता शांत झालेले आहे. मनातील आग हे विकार नष्ट व्हावेत म्हणून लोक वनात जातात. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. मनातील हा विकाररुपी अग्नी शांत करण्यासाठी प्रभु नामरुपी जल प्रभु परमात्म्याशिवाय प्राप्त होत नाही. ह्या विषयविकार रुपी अग्नीने मानवाला, जाळले आहे. पण 'रामनामरुपी जलाने' भक्तांचे ह्या अग्नीपासून रक्षण केले आहे. प्रभु नामामुळे ह्या भवसागराचे रुपांतर सुख सागरात झाले आहे. ज्याला प्रभु नाम प्राप्त झाले असा भक्त प्रपंचात राहन ही सुख प्राप्त करतो. व प्रभु नामाचे अखंड रसपान करतो. त्यामुळे सर्वांनी त्या शारंगपाणीचे, त्या प्रभु परमात्म्याचे सदैव स्मरण केले पाहिजे. त्या प्रभुनाम रुपी जलाने माझ्या मनातील विषय विकारांची तहान जशी नष्ट झाली तशी तुमच्या ही मनातील विषय विकार नष्ट होतील.

नामस्मरण ही गोष्ट अशी आहे की, तिची सवय लागली की त्याची ओढ वाढतच जाते. तहान लागल्यावर पाणी पिले की तहान कमी कमी होत जाते व पण प्रभु नामस्मरण रुपी तहान अशी आहे की ती सदैव वाढतच जाते. वाढणारी तहान हे अध्यात्म्याच्या मार्गातील प्रगतीचे लक्षण आहे. नामस्मरणाने भक्तांना प्रभुकृपेचे कवच, संरक्षण प्राप्त होते. हे सांगतांना कबीर लिहितात—

माधउ, जल की पिआस न जाइ। रहाउ ।।
जल महि, अगनि उठी अधिकाइ ।। १।
तूं जल निधि, हउ जल का मीनु।
जल महि रहउ, जलहि बिनु खीनु ।। १।।
तूं पिंजरु, हउ सुअटा तोर।
जमु मंजारु, कहा करै मोर।। २।।
तूं तरवरु, हउ पंखी आहि।
मंदभागी, तेरो दरसनु नाहि।। ३।।
तूं सतिगुरु, हउ जडतनु चेला।
कहि कबीर, मिलु अंत की बेला।। ४।।

कबीर या दोह्यात सांगतात की, माधवाचे नाम, प्रभु परमात्म्याचे नाव हे असे अमृत मधुर जल आहे की त्याचे प्राशन कितीही केले तरी तहान काही केल्या भागत नाही. मनाची तृप्ती होत नाही. उलट तहान वाढतच जाते. हे परमेश्वरा तू सागर आहेस मी त्यात विहार करणारा मासा आहे, मी तुझ्या जिवंत आहे. प्रभु नामा शिवाय मी एक क्षण ही जगु शकणार नाही. मरुन जाईन. हे परमेश्वरा तू पिंजरा आहेस, मी त्यात राहणारा तुझा पोपट आहे. तुझे

भक्कम संरक्षण मला प्राप्त झालेले आहे. आता ते यमरुपी मांजर माझे काहीही वाकडे करु शकणार नाही. हे परमेश्वरा तू विशाल वृक्ष आहेस. या वृक्षाच्या आश्रयाने राहणारा मी एक सामान्य पक्षी आहे. पण मला अभाग्याला अद्याप तुझे दर्शन झाले नाही. हे परमेश्वरा तू सत्‌गुरु आहेस. मी तुझा नूतन शिष्य आहे. माझ्या अंतिम समयी

तुझे दर्शन घडू दे. तुझ्याशी माझे मिलन होऊ दे. असे झाले की माझ्या जीवनाचे सार्थक होईल. हे मिलन घडवून आणण्याचे सामर्थ्य फक्त नामस्मरणात आहे.

कबीरांचे सांगणे आहे की, जेव्हा परमेश्वर भक्ताचा स्वीकार करतो. त्याला आपल्याजवळ स्थान देतो. तेव्हाच त्या भक्ताला खरी प्रतिष्ठा प्राप्त होते. मानवाने इतर सर्व गोष्टींचा त्याग करुन परमेश्वराच्या भजनात, नामस्मरण रंगून गेले पाहिजे. त्यामध्येच जीवांचे कल्याण आहे. हे सांगतांना कबीर लिहितात.—

'तब जानहुगे, जब उघरैगो पाज ।। ३।।
कह कबीर, पति हरि परवानु।
सरब तिआगि, भजु केवल राम ।।४।।३।।

तत्कालीन काही लोक, साधू हे नग्न फिरुन डोक्याचे मुंडन करुन, ब्रह्मकर्माचे पालन करुन देहदंडन करुन परमात्म्याच्या प्राप्ती साठी प्रयत्न करीत. या गोष्टी कबीरांना पटत नव्हत्या. यापेक्षा फक्त रामाचे नामस्मरणच परमात्म्याच्या मिलनासाठी उपयुक्त आहे. अशी त्यांची धारणा होती म्हणून कबीर लिहितात.

नग्न फिरत, जौ पाईऐ जोगु।
बन का मिरणु, मुकति सभु होगु ।।१।।
किआ जागे, किआ बाधे चाम।
जब नहि चीनसी, आतमाराम ।।१।।रहाउ।।
मूड मुंडाए, जो सिधि पाई।
मुकती भेड, न गईआ काई ।।२।।
बिंदु राखि, जौ तरीऐ भाई।
खुसरै, किड न परमगति पाई ।। ३।।
कहु कबीर, सुनहु नर भाई।
राम नाम बितु, किनि गति पाई कहु कबीर, सुनहु नर भाई।
राम नाम बितु, किनि गति पाई।।४।।४।।

कबीर या दोह्यात सांगतात नग्न फिरल्याने जर प्रभु परमात्मा प्राप्त झाला असता तर जंगलातील सर्व जनावरांना मुक्ती मिळाली असते.

हे मानवा जोपर्यंत तू प्रभु परमात्म्याचे सत्य स्वरुप जाणत नाहीस, त्या आत्मारामास ओळखत नाहीस तोपर्यंत तू नागडा राहिलास काय किंवा अंगभर वस्त्रे धारण केलीस काय, त्या कशाचाही काहीही उपयोग होणार नाही. हे मानवा डोक्याचे मुंडन केल्याने जर सिध्दी मिळाली असती तर आतापर्यंत साऱ्या मेंढया की ज्यांच्या अंगावरची लोकर कापली जाते त्या मुक्तीपासून कशा बरे वंचित राहिल्या असत्या?

कबीर सांगतात, या सर्व बाह्यउपचाराच्या गोष्टी सोडून द्याव्यात व रामनाम घ्यावे. रामनाम घ्यावे. रामनाम शिवाय तरणोपाय नाही.

कबीर सांगतात आपण जीवंत आहोत तोपर्यंत या शरीराचे लाड आपण पुरवितो, गोडधोड खातो, चांगली वस्त्रे नेसतो पण मृत्युनंतर मात्र याच शरीराला जाळले, पुरल जाते. अशावेळी मृत्यु पश्चात शरीर, आत्मा यांना मुक्ती मिळवायची असेल तर नामस्मरणाद्वारे परमात्म्याच्या चरणांचे दर्शन घडणे आवश्यक आहे, म्हणून कबीर लिहतात

'जिह मुखि पाचउ, अंकग्रित खाए । तिह मुख देखत लूकट लाए।। १।।
इकु दुखु, रामराइ, काटहु मेरा ।अगनि दहै अरू गरभ बसेरा।।
काइआ बिगुती, बहू बिधि भाती ।को जारे, को गडि ले माटी ।।२।।
कहु कबीर हरि चरण दिखावहु ।पाछै ते जमु किउ न पठावहु ।। ३।।

ज्या मुखाने पंचामृताच्या गोडिचा आस्वाद घेतला जातो. त्या मुखावर, जिभेवर मृत्युनंतर जळती लाकडे ठेवली जातात. कबीर परमेश्वराकडे मागणे मागतात की हे प्रभु तुझ्या नामस्मरणाच्या जोरावर मला या जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सोडव. नामस्मरणाच्या सहाय्याने तुझ्या चरणांचे दर्शन मला घडू दे म्हणजे मी खुशाल यमराजाकडे जायला तयार होईन. कबीरांना हे सांगावयाचे आहे की नामस्मरणात एवढी ताकद असते की व्यक्तीला पुढे मृत्युचे भय राहत
नाही.

रामनामाचे एवढे सामर्थ्य आहे की मोह—माया या पासून आपली सहज सुटका होते. सर्व मग या रामनामस्मरणानेच भारावून गेले आहे असे कबीरांना वाटते कबीर लिहतात—

'ना मै जोग धिआन चितु लाइआ। बिनू बैराग, न छुटसि माइआ।। १।।
कैसे जीवतु होइ हमारा द्यजब न होइ राम नाम अधारा ।।२।।
कहू कबीर, खो जड असमात द्यराम समान न देखउ आत।।

कबीरांचे सांगणे आहे की, मनात वैराग्य उत्पन्न होण्यासाठी लोक योग मार्गाचा अवलंब करतात पण मी योग मार्गाकडे वळलो नाही आणि वैराग्य उत्पन्न झाल्याशिवाय मायेपासून सुटका होत नाही. रामनामाचा आधार आपल्या जीवानाला असेल तर आपले काम होणार. कबीर सांगतात मी साऱ्या जगात अगदी आकाशापर्यंत शोध घेतला पण प्रभु रामनामासारखे सर्व श्रेष्ठ असे मला काही दिसले नाही.

कबीरांचे सांगणे आहे जे अहोरात्र परमेश्वराच्या नामस्मरणात तल्लीन होतात व मायेपासून सावध राहतात ते परमात्म्याशी एकरुप होऊन सिध्दपुरुषांच्या कोटीत जाऊन पोहचतात. अनेक योगी, साधक, मुनीजन परमेश्वराला प्राप्त करण्यात अपयशी ठरतात कारण त्यांच्याजवळ नामस्मरण असत नाही. जे लोक लोक नामस्मरणात रंगून जातात तेच परमात्म्याशी एकरुप होऊन जातात म्हणून कबीर लिहतात–

अहिनिसि, एक नाम जो जागे। केतक सिध भए, लिव लागे ।।१।।
साधक सिध सगल मुनि हारे। एक नाम, कलिण तर तारे द्य।।२।।
जो हरि हरे, सु होहि न आता। कहि कबीर, राम नाम पछाना।

ज्याचे मन प्रभुशी एकरुप झालेले आहे. प्रभु नामस्मरणात जो तल्लीन झालेला आहे. त्याची या मोहमायेतून आपोआप सुटका होते. असे कबीरांचे सांगणे आहे, त्यामुळेच कबीर लिहतात–

'कडनु को पूतु, पिता को का को। कडनु मरै, को देइ संतापो।।१।।
हरि ठग, जग कड ठगहरि लाई।
हरि के बिओग, कैसे जीअउ मेरी माई।
कउन को पुरखु, कउन के नारी।
इआ तत, लेहु सरीर बिचारी।।२।।
कहि कबीर, ठग सिड मनु मानिआ।
गई ठगउरी, ठगु पहिचानिआ।।३।।

कबीर स्पष्ट करतात की कोण कोणाचा पुत्र आहे? कोण कोणाचा पिता आहे? कोण मरतो? कोण कोणाला दु:ख देतो? ही संपूर्ण त्या प्रभु परमात्म्याची लीला आहे, माया आहे. या मायेच्या मोहीनीमध्ये त्याने हे सारे जग गुंगवून टाकले आहे. पण हे माझ्या माते! मी परमेश्वराशिवाय जगूच शकत नाही. कोणकोणांचा पती नाही की कोणकोणाची पत्नी नाही हा सारा केवळ शारीरीक विचार आहे. आध्यात्मिक पातळीवर सर्व एकच आहेत त्यात काही ही भेद नाही कबीर विचारपूर्वक सांगतात की ही सारी माया उत्पन्न करणाऱ्या जादूगर प्रभू परमात्म्यास ज्याने ओळखले व ज्याचे मन नामस्मरणाद्वारे त्या प्रभुशी एकरुप झालेले आहे त्याची या मोहमायेतून सुटका होते.

स्पर्श करु शकत नाही कबीर लिहतात

जलि है सूतकु, थल है सूतकू, सूतक उपति होई।
जनमे सूतकु, मूए फुनि सूतकु, सूतक परज बिगोई।।१।।
कहु रे पंडिआ, कउन पीवता।
ऐसा गिआनु जपह, मेरे मीना।।२।।
नैनहु सूतकु, बैनहु सूतकु, सूतक स्त्रवनी होई।
ऊठत बैठत सूतकु सभु कोऊ जातै।
छुटन की इकु कोई।
कहि कबीर रामु रिदै बिचारै, सूतकु तिनै न होई।।

कबीरांचे काळी सुतक, विटाळ शिवाशिवी असे भेदाभेद खूप होते. पवित्र अपवित्र अशा खुळचट कल्पना होत्या. या सर्वावर कबीरांनी टिका केलेली आहे. कबीर सांगतात पाणी, जमीन अपवित्र आहे असे मानतात. कोणी मेला की सुतक, कोणी जन्मला की सुतक या कल्पनेने अनेक लोक दु:खी झालेली आहेत. काम पवित्र आणि काम अपवित्र याचा सारासार विचार करावा असे कबीरांचे सांगणे आहे, परस्त्रीकडे वाईट नजरेने पाहणे ही डोळयांची अपवित्रता आहे. अपशब्द उच्चारणे ही वाणीची अपवित्रता आहे. दुसऱ्यांची निंदा लालसी कानांनी ऐकणे ही कानांची अपवित्रता आहे बसता सर्वात ही अपवित्रता आहे या पवित्र अपवित्र विचारात सगळे जग फसले आहे. ज्याचे मन परमेश्वराच्या नामस्मरणात गुंतलेले आहे. त्याला अपवित्रता स्पर्श करु शकत नाही. असे कबीरांचे सांगणे आहे.

**समारोप**

संत कबीर यांची वाणी 'बीजक' ग्रंथात संकलित आहे. सहाशेपदे आणि आठशे साख्या त्यांच्या मानल्या जातात. कबीरांची भाषा संमिश्र आहे. व्रज, अवधी बरोबर भोजपुरी खडीबोली आणि अरबी–फारसीचे मिश्रण त्यात असलेने ती खिचडी अथवा सधुकड्डी म्हटली गेली आहे. कबीरांची भाषेवरील पकड व अभिव्यक्ती जोरकस अशी आहे. नामस्मरणाचे महत्व विशद करीत तत्कालीन वाईट रुढी–प्रथा, अंधश्रध्दा यांच्यावर ती कोरडे ओढताना दिसते. संत कबीरांच्या वाणीतील अध्यात्मिकता ही प्रयत्नवादाची पुरस्कर्ती आहे. हे कबीरांच्या उपदेशाचे आगळेवेगळे वैशिष्टय आहे.

**निष्कर्ष**

१) संत कबीरांच्या जन्माविषयी मतमतांतरे दिसून येतात.
२) कबीरांच्या कालखंडात सामाजिक भेदाभेदाला उच्चवर्णीयांच्याकडून विशेष महत्व दिले जात होते. या सामाजिक भेदभावालाच सुरुंग लावण्याचे काम कबीरांनी केलेले दिसून येते.
३) कबीरांनी ४०० दोहे व ८०० साख्या लिहून भारतीय संत साहित्यात मोलाची भर घातलेली आहे.
४) कबीरांनी आपल्या दोह्यांतून सर्व सामान्य लोकांना खरा भक्तीमार्ग विशद केला. या प्रसंगी धर्ममार्तंडांचा विरोध त्यांनी झुगारुन दिला.

५) 'मगहर' या ठिकाणी देहत्याग करुन कबीरांनी मृत्यूनंतर देखील अंधश्रध्देला छेद दिला.
६) कबीरांनी आपल्या उपदेशातून निसर्ग प्रतिमांचा वापर करुन नामस्मरण भक्तीचा पुरस्कार केला.
७) नामस्मरण भक्तीच्या पुरस्कारामागे कबीरांनी कर्मवाद, प्रयत्नवादाला महत्व दिलेले दिसते.
८) तत्कालीन भोंदूगिरीवर कबीरांनी आपल्या दोह्यातून कडाडून हल्ला चढविलेला दिसतो.

**संदर्भ**

१) म्हणे कबीर (मराठी भावानुवाद) — विनायक लिमये, तारासिंह गोरोवाडा, प्रकाशक सिख धर्म प्रचारक कमिटी, पुणे, प्रथमावृत्ती मार्च २००६.
२) संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मूलन, संपादक— प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशक, कोल्हापूर, २०१८.